दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
• वर्ष १५ वे • अंक ३२० • MAHMAR/2006/17212 • रायगड • शनिवार दि.१३ फेब्रुवारी २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## 'अतिशय महत्त्वाचं कामकाज' भाजपचा लोकसभा खासदारांना व्हीप

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लोकसभेचे कामकाज उद्या सकाळी १० वाजता सुरू होईल. अनेक महत्त्वाच्या विधेयकांवर उद्या सभागृहात चर्चा होईल. यापार्श्वभूमीवर भाजपने खासदारांना तीन लाइनचा व्हीप जारी केला आहे. काही महत्त्वपूर्ण अर्थ विधेयकांवर लोकसभेत उद्या १३ फेब्रुवारीला म्हणजेच शनिवारी चर्चा होईल आणि ते सभागृहात मंजूर केले जाऊ शकतात. लोकसभेतील सर्व भाजप सदस्यांनी उद्या सकाळी १० वाजेपासून सभागृहात सकारात्मकपणे उपस्थित रहावं आणि सरकारला पाठिंबा द्यावा, अशी सूचना पक्षाने केली आहे.

लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी आजच सभागृहाला माहिती दिली. लोकसभेचं कामकाज उद्या १३ फेब्रुवारीला सकाळी १० वाजता सुरू होईल. अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा २९ जानेवारीपासून ते १३ फेब्रुवारी चालेल. तर दुसऱ्या टप्प्याट ८ मार्च ते ८ एप्रिल या कालावधीत संसद अधिवेशनाचं कामकाज चालणार आहे. शनिवारी १३ फेब्रुवारीला सकाळी १० वाजता लोकसभेचं कामकाज सुरू होईल, असं लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सांगितलं.

# खा.शरद पवार यांच्या शिष्टाइने हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांचा पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लागणार

**दै.रायगड नगरी । उरण**

**उरण तालुक्यातील जेएनपीटी प्रकल्पग्रस्त हनुमान कोळीवाडा ग्रामस्थ शोधात असलेल्या पुनर्वसनाच्या १७ हेक्टर जागेचा शोध शेकडो बैठका, आंदोलने, मोर्चे, उपोषणे करूनही गेली ३७ वर्षानंतर अखेर राष्ट्रवादी काँग्रेसचे पक्षाध्यक्ष खा.शरद पवार यांच्या मध्यस्तीने लागला असून हनुमान कोळीवाड्याचे पुनर्वसन जेएनपीटीच्या माध्यमांतून १७ हेक्टरमध्ये करण्याचे आश्वासन केंद्रीय नौकानयन राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) मनसुख मांडविया यांनी खा.शरद पवार यांच्या उपस्थितीत दिल्ली येथे ना. मांडविया याच्या दालनात झालेल्या विशेष बैठकीत दिल्याने उरण तालुक्यातील हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.**



जेएनपीटी बंदरच्या निर्मितीसाठी हनुमान कोळीवाडा हे गाव ३७ वर्षापूर्वी विस्थापित करण्यात आले होते. त्यानंतर या गावाला वाळविने ग्रासले आणि प्रकल्पग्रस्तानी उभारलेली घरे पत्यासारखी कोसळली. त्यावेळे पासून ग्रामस्थ हे पुनर्वसनाच्या जागेचा शोध घेत होते. खरे तर जेएनपीटीने सरकारला जागेचा पूर्ण मोबदला न दिल्याने केवळ २ हेक्टर जागेवर पुनर्वसनन करता केवळ तात्पुरती राहण्याची सोय केली होती असे तेथील ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

तेव्हापासून ग्रामस्थ या पुनर्वसनाचा शोध घेत आहेत.परंतु हजारो बैठका, आंदोलने, मोर्चे,उपोषणे करूनही गेली ३७ वर्षे हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांना या पुनर्वसनाचा शोध लागत नव्हता. अखेर राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस प्रशांत पाटील यांच्या मध्यस्थीने खा.सुनील तटकरे यांनी हा प्रश्न सोडविण्या साठी राष्ट्रीय नेते खा.शरद पवार यांना सोडविण्याची विनंती करून हा प्रश्न मार्गी लावला या साठी दिल्ली येथे खा.शरद पवार यांच्या निवासस्थानी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस नौकानयन मंत्री मनसुख मांडवियाया, जेएनपीटीचे अध्यक्ष संजय सेठी, खा. सुनील तटकरे, प्रदेश चिटणीस प्रशांत पाटील, उरणमतदारसंघ विधानसभा अध्यक्षा सौ.भावना घाणेकर, नवीमुंबई राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष जी.एस.पाटील, रमेश कोळी, हरेश कोळी, नितीन कोळी, नरेश अनंत कोळी उपस्थित होते.

जेएनपीटीचे अध्यक्ष संजय सेठी यांनी यावेळी सांगितले की ६ हेक्टर जागा आम्ही देऊ १० हेक्टर जागा रायगड जिल्हाधिकारी देतील मात्र खा. सुनील तटकरे यांनी महाराष्ट्र पुनर्वसन कायद्यानुसार हनुमान कोळीवाड्याचे पुनर्वसन हे १७ हेक्टर जागेतच करावयाचे आहे.यावर खा.शरद पवार यांनी नौकानयन मंत्री संपूर्ण कायदा काय व कसा आहे, याचे स्पष्टीकरण केले यावर केंद्रीय नौकानयन मंत्री मनसुख मांडवियायांनी हनुमान कोळीवाडा गावाचे पुनर्वसन हे १७ हेक्टर जागेतच करण्यात येईल असे आश्वासन दिले. लवकरच या संदर्भात जिल्हाधिकारी यांना जिल्ह्याच्या पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या माध्यमातून सूचना देण्यात येणार असल्याचे सुतोवाच्य खा.सुनील तटकरे यांनी केले असल्याने पुनर्वसना बाबतच्या ग्रामस्थांच्या आशा पल्लवित झाल्या असून ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. सर्वच ग्रामस्थांनी आणि विशेषता महिलांनी खा.शरद पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे आभार मानले आहेत.

## संक्षिप्त...

### पूजा चव्हाण आत्महत्या ; संजय राठोड याच्यावर गुन्हा दाखल करा : चित्रा वाघ

**दै.रायगड नगरी । मुंबई**

परळी येथील तरुणी पूजा चव्हाण आत्महत्य करण्यावरून दोन व्यक्तींतील ऑडिओ क्लिप व्हायरल झाल्याने या आत्महत्या प्रकरणाला वेगळे वळण लागण्याची शक्यता आहे. या आत्महत्येमुळे राजकीय वातावरण तापले आहे. याप्रकरणात भाजपाच्या प्रदेश उपाध्यक्षा चित्र वाघ यांनी ट्वीटद्वारे शिवसेना नेते संजय राठोड यांच्याविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. संजय राठोड हे शिवसेनेचे विदर्भातील कॅबिनेट मंत्री आहेत.

वाघ यांनी म्हटले आहे की, गृहमंत्रीजी सध्या राज्यातील महिला अत्याचारावबाबत संजयची म्हणजेच जे जे दिसेल ते ते पहावे ते साथी सत्ताधाऱ्यांना कथन करत क्लीनचीट देत पुढे चालावेच्या भुमिकेत दिसताहेत,. पूजा चव्हाण केसमध्ये मोबाईलच मोठा पुरावा आहे. १२ संभाषण क्लीप्स मिळाल्या आहेत.ज्यात तिला आत्महत्येस परावृत्त करण्यापासून तर आत्महत्या झाल्यानंतर कसही करून तिचा मोबाईल ताब्यात घेण्यापर्यंतच्या सुचना कथित मंत्र्याकडून कुण्या अरूणला होताना सगळ्यांनी ऐकल्या,, अजूनही याबद्दल पोलिस काहीही स्पष्टता देत नाही.

पूजा चव्हाणच्या परीवारावर दबाव असू शकेल पोलीस अशा केसेस स्यु-मोटो दाखल करून घेऊ शकतात हे मी आपल्याला सांगायला नकोच अर्थात त्यासाठी राजकीय इच्छाशक्ती महत्वाची आहे. मुख्यमंत्री महोदय, एवढे पुरावे असताना मुसक्या आवळायच्या सोडून कसली वाट पहाताय?? असा सवाल चित्र वाघ यांनी करत संजय राठोड यांचे थेट नाव घेऊन त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

## रायगड जिल्ह्यासाठी पुढील वर्षी घोषित केलेल्या वार्षिक आराखडा निधीपेक्षा अधिकचा ५० कोटी विकास निधी बक्षिस देणार : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

रायगड जिल्ह्याच्या भौगोलिक विकासा करिता महाराष्ट्र राज्य शासना कडुन जिल्हा नियोजन वार्षिक सन आराखडा मध्ये सन २०२०-२०२१ करिता २७५ कोटींचा निधी मंजूर झाला आहे हा निधी येत्या वर्षभरात लोकपयोगी विकासासाठी खर्च करून राज्याचे मुख्यमंत्री आदरणीय उद्धवजी ठाकरे यांनी जिल्ह्यात मंजुर प्राप्त निधी पुर्णपणे खर्च करेल त्या जिल्ह्यासाठी पुढील वर्षी घोषित केलेल्या वार्षिक आराखडा निधी पेक्षा अधिकचा ५० कोटी विकास निधी बक्षीस म्हणून देण्यात येईल असे घोषित केले आहे.

मुख्यमंत्री महोदयांनी घोषित केलेला बक्षीस निधी पटकविण्यासाठी आपणाकडून नक्कीच यशस्वी प्रयत्न केले जातील आणि रायगड जिल्हाच ५० कोटींचा अधिकचा निधी प्राप्त करेल असे रायगड जिल्हा पालकमंत्री आदिती तटकरे यांनी अलिबाग येथील नियोजन भवन येथे आयोजित पत्रकार



परिषदेत वार्तालाप करताना सांगितले. दिनांक १२ फेब्रुवारी २०२१ रोजी राज्याचे पाणी पुरवठा मंत्री ना.गुलाबराव पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत नियोजन भवन येथे जिल्हा पाणी पुरवठा आढावा सभा संपन्न झाली. या वेळी त्यांनी सविस्तरपणे माहिती देताना उपलब्ध जिल्हा नियोजन अंतर्गत निधी नैसर्गिक आपत्तीत नुकसान झालेल्या शाळा, अंगणवाडी, ग्राम पंचायत कार्यालय, सामाजिक इमारती, ग्रामीण भागातील रस्ते दुरुस्ती व बांधकाम यांना प्राधान्य देण्यात येईल तसेच मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांनी सांगितले नुसार मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेमधून जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून रस्ते विकासाला प्राधान्य देण्यात येणार आहे. नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत सुचविलेल्या बाबींमध्ये जिल्ह्यात डायल्यासिस सेंटर,मोबाईल डायल्यासिस सेंटर, बोट अंबुलन्स, अपघात प्रसंगी रेस्क्यू टीम करता लागणारे साहित्य, ज्या प्रमाणे ..../२

## रायगड जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत जिल्ह्याच्या विकासासाठी २७५ कोटी मंजूर

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली ( दि. ११ रोजी मुंबई येथे ) रायगड जिल्हा वार्षिक योजनेची (सर्वसाधरण) सन २०२१-२२ ची राज्यस्तरीय बैठक संपन्न झाली. रायगड जिल्ह्याच्या पर्यटन वृद्धी व स्थानिकांना रोजगार या दृष्टीकोनातून शाश्वत पर्यटन विकास करण्यासाठी मंत्रालयात झालेल्या जिल्हा वार्षिक योजना राज्यस्तरीय बैठकीत २७५ कोटी रूपयांच्या निधीस मंजूरी देण्यात आली आहे.

रायगड जिल्हा निसर्ग सौंदर्याने नटलेला प्रमुख पर्यटन जिल्हा असल्याने जिल्हास्तरावरुन पर्यटन विकासाचे अनेक उपक्रम व योजना राबविण्यासाठी सन २०२१-२२ च्या जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत २७५ कोटीं रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

या बैठकीला राज्याच्या उद्योग आणि खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, विधी व न्याय, माहिती व जनसंपर्क, राज्यमंत्री तथा पालकमंत्री ना.कु.आदिती तटकरे, ..../२

## जल जीवन मिशन अंतर्गत रायगड जिल्ह्यातील उत्तम काम : ना.गुलाबराव पाटील



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जल जीवन मिशन अंतर्गत रायगड जिल्ह्यात आत्तापर्यंत चांगले काम करण्यात आले असल्याचे प्रतिपादन राज्याचे पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे मंत्री गुलाबराव पाटील यांनी शुक्रवारी (ता.१२) येथे दिली. तसेच जल जीवन मिशन अंतर्गत कामांसाठी शासनाकडून रायगड जिल्ह्याला निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही, अशी ग्वाहीदेखील त्यांनी दिली.

जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागामार्फत सुरू असलेल्या जिल्ह्यातील विविध पाणी पुरवठा योजनांचा आढावा गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन भवन येथे आयोजित बैठकीत शुक्रवारी घेण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री कु. आदिती तटकरे, जिल्हा परिषद अध्यक्षा योगिता पारधी, आमदार भरत गोगावले, आमदार महेंद्र दळवी, आमदार महेंद्र थोरवे, आमदार रवींद्र पाटील, माजी आमदार मनोहर भोईर, जल जीवन मिशन संचालक आर. विमला, जिल्हाधिकारी निधी चौधरी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील यांसह विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे मंत्री गुलाबराव पाटील यांनी या बैठकीत प्रत्येक तालुक्यानुसार जल जीवन मिशन अंतर्गत वैयक्तिक नळ कनेक्शन, शाळा, अंगणवाड्यांना जोडण्यात येणाऱ्या नळ कनेक्शनची माहिती घेतली. तसेच जिल्ह्यातील पूर्ण, अपूर्ण, प्रस्तावित नळपाणी पुरवठा योजनांची माहिती घेतली.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, पाणी पुरवठा विभागाचे उप कार्यकारी अभियंता संजय वेंगुर्लेकर यांच्यासह गटविकास अधिकारी, पाणी पुरवठा विभागातील अधिकारी यांनी ..../२

## शिवजयंती उत्सव साध्या पध्दतीने साजरा करण्याचे निर्देश



**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरानाचे संकट अजूनही पुर्णपणे संपले नाही. त्यामुळे यावर्षी १९ फेब्रुवारीला होणारी 'छत्रपती शिवाजी महाराज जयंती' साधेपणाने साजरी करण्याच्या सुचना राज्य शासनाच्यावतीने देण्यात आल्या आहेत. यालाच अनुसरून पनवेल महानगरपालिकेने शहरातील शिवजयंती मंडळानी यावर्षीचा शिवजयंतीचा उत्सव साधेपणाने साजरा करावा असे आवाहन केले आहे.

कोरानाचा प्रादुर्भाव वाढू नये यासाठी कोणत्याही प्रकारच्या बाईक रॅली, प्रभात फेरी, मिरवणुका काढण्यात येऊ नये, तसेच कोणत्याही प्रकारे सार्वजनिक ठिकाणी पोवाडे व्याख्यान,गाणे नाटक, असे सादरीकरण किंवा सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यास मनाई करण्यात आली आहे.

शिवप्रेमीनी शिवजयंती दिवशी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला किंवा प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम आयोजित करून त्या ठिकाणी सोशल डिस्टन्सींग पालन करून शंभर व्यक्तींच्या उपस्थितीत ..../२

## शिवभोजन चालकांनी शासन नियमाप्रमाणे काम न केल्यास कारवाई : मधुकर बोडके



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या महत्वाकांक्षी योजना असलेल्यांपैकी शिवभोजन योजनेला १ वर्ष पूर्ण झाले असून, गरीब व गरजू व्यक्तींना स्वस्त दरात स्वच्छ, पोषक, ताजे भोजन मिळावे या योजनेचा प्रमुख उद्देश असून रायगड जिल्ह्यात या योजनेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. याच पार्श्वभूमीवर जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके यांनी जिल्ह्यातील शिवभोजन चालकांची बैठक अलिबाग येथे बोलाविली होती. शिवभोजन चालकांकडून शासन नियमाप्रमाणे काम होत नसून त्याबद्दल जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी कारवाईचा इशारा दिला आहे.

रायगड जिल्ह्यातील १०७ शिवभोजन केंद्र चालकांची बैठक जिल्हाधिकारी कार्यालय अलिबाग येथे बोलाविण्यात आली होती. यामध्ये काही केंद्र चालकांकडून वारंवार चुका होत आहेत. फोटो काढताना देखील चुका होत आ-हेत. संपूर्ण जिल्ह्यामध्ये १७००० थाळी मंजूर असून कार्यालयातर्फे सर्वतोपरी मदत करण्याची तयारी असल्याचे बोडके यांनी सांगितले. तरी योजनेची योग्य तऱ्हेने अंमलबजावणी करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



केंद्र चालकांना कोणत्याही प्रकारची समस्या असल्यास किंवा शिवभोजनाच्या बिलाबाबत शंका असल्यास त्यांनी हरिष डोंगरे लेखाधिकारी यांच्याशी भ्रमणध्वनीवर संपर्क करून माहिती घेण्याचे सांगण्यात आले. त्याचप्रमाणे ज्येष्ठ पत्रकार सुनील पोतदार यांनी शिवभोजनाच्या बिलावरती नव्याने लागू करण्यात आलेल्या जीएसटी संदर्भात शासनाकडून योग्य माहिती घेवून केंद्र चालकांना देण्यात यावी, अशी मागणी केली. त्याचप्रमाणे केंद्र चालकांच्या बिलाची रक्कम ३ दिवसात त्यांच्या खात्यात जमा न झाल्यास जीएसटीच्या दंडाच्या कारवाईला शासन की अधिकारी जबाबदार असा प्रश्न देखील उपस्थित केला. या बैठकीसाठी दिपक मुळे अव्वल कारकून रायगड, सुमित चव्हाण जिल्हा तांत्रिक अधिकारी, हरिष डोंगरे लेखाधिकारी रायगड, बिराजदार अव्वल कारकून उरण, हसन कामनवाले एस.ए.के.पनवेल यांच्यासह जिल्ह्यातील शिवभोजन केंद्र चालक उपस्थित होते.

## सिडकोच्या सानपाडा येथील निवासी तथा वाणिज्यिक भूखंडांना प्राप्त झाले विक्रमी दर

### १९ भूखंडांच्या विक्रीतून सिडकोच्या तिजोरीत ६७७ कोटींची भर

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सिडको महामंडळातर्फे ई-लिलाव व ई-निविदा प्रक्रियेद्वारे खारघर, सानपाडा, कळंबोली व उलवे येथील एकूण २० निव-ासी तथा वाणिज्यिक भूखंडांच्या भाडेपट्ट्यावर विक्री योजनेस निविदाकारांचा उत्तम प्रतिसाद लाभून सदर भूखंडांना विक्रमी दर प्राप्त झाला आहे. यामधील सानपाड्यातील सेक्टर १८ मधील २ भूखंडांना प्रत्येकी रू. २,२१,४६८/- व रू. २,६२,५४८/- असे विक्रमी भाव प्राप्त झाले आहेत. या भूखंडांचे आधारभूत दर अनुक्रमे रू. ७७,४६८/- व रू. ९५,०७४/- असे होते. या भूखंडांसोबतच इतर १७ भूखंडाच्या विक्रीतून सिडकोला अंदाजे रू. ६७७ कोटीचा महसूल प्राप्त झाला आहे.

योजना पुस्तिकेतील वेळापत्रकानुसार संपूर्ण प्रक्रिया पार पडून १२ फेब्रुवारी २०२१ रोजी ऑनलाईन माध्यमातून ई-निविदा उघडण्यात आल्या व ई-लिलाव प्रक्रियेमधील बोलींची तुलना करण्यात येऊन यशस्वी निविदादारांची नावे जाहीर करण्यात आली आहेत.

सदर योजनांतर्गत सिडको महामंडळातर्फे ..../२

# अशांत अर्धविराम

भारत आणि चीन यांच्यातील संघर्षानंतर चालू असणारी द्विपक्षीय बोलणी काहीशी यशस्वी झाल्याचे दिसते. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी दोन आठवड्यांपूर्वी दिलेल्या एका जाहीर व्याख्यानात चीनने भारताचा विश्वास कसा गमावला आहे, याचे विवेचन केले होते. त्यावेळी, त्यांनी दोन्ही देशांचे संबंध सुरळीत व्हायचे असतील तर काय करावे लागेल, याची एक आठ कलमी यादीच सादर केली होती. त्या यादीत प्रत्यक्ष ताबारेषांचा आदर आणि यापूर्वी झालेल्या सगळ्या करारांची प्रामाणिक अंमलबजावणी यांचा समावेश होता. भारत हा चीनसमोर कितीही कठीण परिस्थिती ओढवली तरी आता यापुढे झुकणार नाही आणि आक्रमणही खपवून घेणार नाही, ही त्या व्याख्यानाची अधोरेखा होती. जयशंकर जे सूचित करत होते; ते भारतीय जवान पूर्व लडाखमधील सीमावर्ती प्रदेशात प्रत्यक्षात आणत आहेत. गेल्या आठ–नऊ महिन्यांमध्ये या पँगाँग त्सो म्हणजे पँगाँग सरोवराच्या आसमंतात चीनला बिलकुल हालचाल करता आलेली नाही. थोडाफार भाग बळकवायचा आणि नंतर चर्चेत मात्र तो सगळा सोडायचा नाही, अशी चीनची जुनी रीत आहे. काहीही करून देशाच्या सीमा चारी बाजूंनी अगदी फुटा–फुटाने सतत रेटत राहायच्या, हा चिनी विस्तारवाद आहे. अशा चीनने संयुक्त निवेदनाची वाट न पाहता आपल्या 'ग्लोबल टाइम्स' या सरकारी इंग्रजी वृत्तपत्रातून दोन्ही देशांनी या संघर्ष उडालेल्या भागातून माघार घेण्यास मान्यता दिल्याचे वृत्त प्रकाशित केले आहे. त्यानंतर, भारत सरकारमधील काही अधिकाऱ्यांनीही असे एकमत झाल्याचे सांगितले आहे. याचा अर्थ विशाल पँगाँग सरोवराचा सारा परिसर, लडाख आणि एकूणच भारत व चीन यांचा सीमावर्ती परिसर शांत आणि संघर्षमुक्त होईल, अशा समजात राहण्याचे काही कारण नाही. भारतीय फौजा तसे करणारही नाहीत. याची अनेक कारणे आहेत. एकतर आत्ता या भागातून केवळ रणगाडे व चिलखती वाहने उभय देश मागे घेत आहेत. याचा अर्थ, गस्त घालणारे सैनिक राहणार. या सैनिकांमध्ये किरकोळ कुरबुरी किंवा संघर्ष होणारच नाहीत, असे नाही. दुसरे असे की, या सामंजस्याची व्याप्ती अत्यंत मर्यादित अशा भूभागापुरती आहे. प्रत्यक्षात चीन भारताच्या सीमेवर इतर ठिकाणी लष्करी साधनांची प्रचंड जमवाजमव सातत्याने करीत आहे. अरुणाचल प्रदेशातील भूभागावर मधूनच दावा सांगायचा किंवा पाकिस्तानच्या मदतीने पाकव्याप्त काश्मीरमध्ये काही गडबड करता येईल का, याची चाचपणी करायची, हे चीनने थांबविलेले नाही. आत्ताच्या कराराचा एक अर्थ इतकाच आहे की भारत सहजासहजी दबावाला बळी पडून माघार घेण्याच्या मनस्थितीत नाही, याचा चीनने तात्पुरता तरी स्वीकार केला आहे. आज भारत आणि चीन यांची लष्करी किंवा आर्थिक ताकदीबाबत तुलनाच होऊ शकत नाही. चीन भारताच्या कित्येकपट मोठा आणि शक्तिशाली आहे. तरीही, प्रत्यक्ष सीमेवर भारतीय सैन्याधिकाऱ्यांनी आणि जवानांनी गेले सुमारे वर्षभर जी चिकाटी, धैर्य आणि प्रतिकूल हवामानाशी झगडत राहण्यची जिद्द दाखवली, ती चीनला अनपेक्षित असू शकते. दुसरीकडे, चिनी सैनिक मात्र लडाखमधील अतिशीत हवामानामुळे गारद होत असल्याच्या बातम्या अधूनमधून येत होत्या. याशिवाय, प्रत्यक्ष युद्ध होत नसले तरी युद्धजन्य परिस्थितीमुळे दोन्ही देशांवरचा आर्थिक ताण प्रचंड वाढला होता. सामंजस्याची बोलणी होत असताना हा मुद्दाही दोन्ही बाजूंनी विचारात घेतला असणार. करोना जगाचा हळूहळू निरोप घेत असताना आणि या काळात चीनचे एक नवे रूप जगाच्या समोर आले असताना भारत आणि चीन यांचा संघर्ष आता पुढे काय वळण घेणार, हा आता प्रश्न आहे. भारतात लसीचे उत्पादन होऊ लागल्यानंतर भारताने वेगाने शेजाऱ्यांना तसेच इतरही देशांना लस पुरविली. लस पुरविताना जाचक अटी घालणाऱ्या चीनपेक्षा हे वर्तन अगदी वेगळे होते. परिस्थितीवर मात करण्याची भारताची क्षमता जगाच्या नव्याने लक्षात आली आहे. त्यामुळे, आंतरराष्ट्रीय राजकारणातील भारताची पत निश्चितच वाढली आहे. अमेरिका आणि भारत यांच्यात ट्रम्प राजवटीत जो व्यापक संरक्षण करार झाला, तो बायडेन राजवटीने उचलून धरला आहे. याशिवाय, ऑस्ट्रेलिया, जपान, भारत आणि अमेरिका या चार शक्तिमान आणि चीनला विरोध करणाऱ्या देशांचा समूह दिवसेंदिवस अधिक बळकट होताना दिसतो आहे. आश्चर्य म्हणजे, पाकिस्तानच्या लष्करप्रमुखांनी 'भारताशी आम्हाला संघर्ष करायचा नसून सहमतीनेच मार्ग काढायचे आहेत,' असे विधान नुकतेच केले आहे. कोणताही वाढता संघर्ष व खर्च म्हणजे क्रमाक्रमाने आपला कर्जबाजारी देश चीनचा बटीक बनवणे, हे कळणारे काही राजनीतिज्ञ इस्लामाबादमध्येही असणारच. हे सारे लक्षात घेता चीनने सीमेवरील संघर्षाला जो अर्धविराम दिला आहे; तो म्हणजे चीनसमोर अनेक अंगांनी ताकद वाढवून समर्थपणे उभे राहण्यासाठी मिळालेली संधीच मानायला हवी.

# विद्युत महावितरणचा अजब कारभार ; सिद्धेश्वर व खांडसई राजीप मराठी शाळेची वीज तोडली





**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

कोरोनाच्या संकटात जनजीवन विस्कळीत झाले. अर्थचक्र कोलमडून पडले. जगावे की मरावे या विवंचनेत जनता भरडली, अशात मात्र वाढीव विजबिलांनी कहर माजविला. सध्या वीज देयके न दिलेल्यांचे वीज कनेक्शन तोडण्याचा सपाटा विद्युत महावितरणने लावला आहे. याला मराठी शाळा देखील अपवाद राहिलेल्या नाहीत. सुधागड तालुक्यातील सिद्धेश्वर (बुद्रुक) ग्रामपंचायतीकडून वीज देयके भरण्यासाठी मुदतवाढ मिळण्याची लेखी विनंती करूनही पाली–सुधागड महावितरणकडून काही दिवसांपूर्वी सिद्धेश्वर राजीप मराठी शाळेची वीज तोडण्यात आली आहे. तसेच ग्रामपंचायत हद्दीतीलच खांडसई राजीप मराठी शाळेची वीज तोडली आहे.

या संदर्भात सुधागड तहसीलदार दिलीप रायन्नावार व मनसे तालुकाध्यक्ष सुनील साठे यांच्या मध्यस्थीनंतर गुरुवारी (दि.११) सिद्धेश्वर शाळेची वीज अखेर जोडण्यात आली आहे. मात्र शाळा ही सरकारच्या या जाचातून सुटत नसतील तर ही शोकांतिका असल्याचे म्हटले जातेय. सरपंच उमेश यादव सांगितले की ही शाळा १ ते ७ वी पर्यंत आहे. शाळेचे बिल भरण्यासाठी काही दिवस मुदत द्या यासाठी वीज वितरण कार्यलयाला विनंती करून गुरुवारी (ता.४) लेखी निवेदन करून सुद्धा दिले होते. तरी सुद्धा शाळेचे वीज कनेक्शन तोडले आहेत. शाळांची बिले भरायची जबाबदारी ग्रामपंचायतची आहे. आणि त्याची व्यवस्था १५ व्या वित्त आयोगात केली आहे. मात्र यामध्ये ऑनलाईन पेमेंटचे समस्या आली आहे. त्यामुळे पैसे काढता येत नाहीत. हे सांगूनही शाळांची वीज कनेक्शन तोडली जात आहेत. वीज महावितरणवर थकीत वीजबिल वसुलीचा दबाव समजू शकतो. शाळांना तरी यासाठी मुदत देणे गरजेचे आहे. असे देखील उमेश यादव यांनी सांगितले. या संदर्भात सुधागड मनसे तालुकाध्यक्ष सुनील साठे यांनी कार्यकर्त्यांसमवेत बुधवारी (ता.१०) वीज महावितरण पाली–सुधागडचे कार्यकारी उपअभियंता जतीन पाटील यांची भेट घेतली व सिध्देश्वर शाळेचे वीज कनेक्शन चालू करण्यास सांगितले. यावेळी सुनील साठे यांनी सांगितले की हे सरकार इतके निर्दयी झालेय की ग्रामीण भागातील मराठी शाळांचे वीज कनेक्शन कापुन येथील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान करत आहे. याचा जाहीर निषेध करतो असे साठे म्हणाले. यावेळी मनसे तालुका अध्यक्ष सुनिल साठे, घनश्याम सितापराव, सागर जाधव, रोहन साळुंखे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# माणगाव येथे साकारणार 'मेगा लेदर फूटवेअर ॲण्ड क्सेसरीज क्लस्टर

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

भारत सरकारच्या वाणिज्य मंत्रालयांतर्गत मेगा लेदर फूटवेअर ण्ड क्सेसरीज क्लस्टर ही योजना जिल्ह्यात माण–गाव तालुक्यातील मौजे रातवड येथे राबविण्याबाबतचा निर्णय संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाच्या (लिडकॉम) संचालक मंडळाच्या काल (दि.११फेब्रुवारी रोजी) मंत्रालय येथे संपन्न झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

त्यानुसार मेगा लेदर फूटवेअर ण्ड क्सेसरीज क्लस्टर ही योजना मौजे रातवड येथे होण्याच्या अनुषंगाने महामंडळामार्फत या प्रकल्पाबाबत सविस्तर प्रस्ताव शासनास पाठविण्यात येईल. या योजनेसाठी उद्योग राज्यमंत्री तथा पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांच्या प्रयत्नाने सुमारे १५१ एकर जागा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ देण्याबाबत सकारात्मक आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत हा प्रस्ताव केंद्राच्या वाणिज्य व उद्योग मंत्रालयाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात येणार आहे.

रायगड जिल्ह्यात ८२ हजाराहून अधिक चर्मकार समाज वास्तव्यास आहे. त्यामुळे या प्रकल्पासाठी आवश्यक कुशल कारागीर अधिक प्रमाणात उपलब्ध होण्यास मदत होईल. शिवाय या नियोजित उद्योग प्रकल्पासाठी मुंबई – गोवा महामार्गालगत असलेली ही जागा दळणवळणाच्या सुविधांमुळे भविष्यात ही योजना यशस्वी ठरेल,असा विश्वास सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागानेही दर्शविला आहे.

## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**




# भेंडखळचे बीपीसीएल प्रकल्पग्रस्त रस्त्यावर उतरणार

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील भेंडखळ गा–वातील भारत पेट्रोलियम(इझउङ)च्या उर्वरीत प्रकल्पग्रस्तांना कामावर(नोकरीत ) सामावून घेण्याबाबतचे पत्र दि.६ फेब्रुवारी २०२१ रोजी भारत पेट्रोलियम प्रकल्पग्रस्त संघर्ष समिती, भेंडखळच्या वतीने भेंडखळ येथे असलेल्या BPCL कंपनी प्रशासनाला देण्यात आले आहे.हे पत्र देण्यापुर्वी भारत पेट्रोलियम व्यवस्थापन व प्रकल्पग्रस्त तसेच भेंडखळ चे सरपंच ,सदस्य यांच्याबरोबर झालेली चर्चा देखील करण्यात आली आहे. यापुर्वी अनेक आंदोलने झाली.

माननीय शरद पवार हे मुख्यमंत्री असताना त्यांनी BPCL कंपनी प्रकल्पग्रस्तांच्या रोजगारबाबतची सकारात्मक भूमिका घेतली होती. या सर्वांचा विचार करून इतर बेरोजगार प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून घ्यावे अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा BPCL कंपनी प्रशासनाला एका निवेदनाद्वारे प्रकल्पग्रस्त संघर्ष समिति चे अध्यक्ष अनिल अशोक ठाकुर यांनी दिला आहे.

भारत पेट्रोलियम प्रकल्पात नव्याने नोकरभारती करता येणार नाही असे व्यवस्थापनाचे म्हणणे आहे मात्र केंद्र सरकारच्या नविन आदेशानुसार फिक्स टर्म रेक्रुइट्मेंट म्हणून प्रकल्पग्रस्तांना घेण्यात कोणतीही हरकत नसावी असे प्रकल्पग्रस्तांचे म्हणणे आहे.यामुळे व्यवस्थापनास नविन कामगार मिळतील व सध्या होत असलेल्या खर्चापेक्षा खर्च देखील कमी होईल.मात्र व्यवस्थापन कोणत्याही प्रकारची सकारात्मक भूमिका घेत नसल्याने प्रकल्पग्रस्त संघर्ष समिति आता आक्रमक भूमिका घेण्याच्या तयारीत असून नुकतीच त्यांची एक बैठक पार पडली व त्यामधे पुढील आंदोलनाची दिशा ठरविण्यात आल्याचे व न्याय न मिळाल्यास प्रकल्पग्रस्त लवकरच रस्त्यावर उतरतील असे प्रकल्पग्रस्त संघर्ष समिति चे अध्यक्ष अनिल अशोक ठाकुर यांनी सांगितले. यावेळी उपाध्यक्ष लिलेश्वर भगत ,सेक्रेटरी अक्षय भोईर ,सह सेक्रेटरी रोहिदास घरत ,खजिनदार शक्ति पाटिल ,कमलाकर मोकल,कैलास भोईर,सचिन पाटील,मेघनाथ भगत,महेंद्र घरत,ध्रुवा ठाकूर व इतर सर्व सदस्य उपस्थित होते.

मा.पाठक सो.

वकील श्री.मितुल चं.लव्हेकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश व.स्तर मा.यु.एल.पाठक सो यांचे न्यायालयात

चौ.अर्ज क्र.१६१/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.७/४/२०२१

श्री.हसुराम केशव भोईर — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

वरील अर्जदार यांचे काका श्री.हिरालाल तुकाराम भोईर, रा. घर नं.१२९ मु.न्हावा, भोईर आळी पाण्याच्या टाकीजवळ पो. न्हावा, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०६ यांचे दिनांक १६/१०/२०२० रोजी मयत झाले. सदर मयताच्या वारसाची नावे खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| **श्री.हसुराम केशव भोईर** | **पुतण्या** | **अर्जदार** |

**जमिनीचे तपशिल ''अ''**

| ॲवॉर्ड युनिट केस नं. | सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|---|
| १/९४/२ न्हावे | २ अ | ८७ | ०–३५–० |

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदाराने मृत्यूपत्राद्वारे वारसाहक्क दाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क, अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्यांनी तसा लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे वारसाहक्क म्हणून दाखला प्रमाणपत्र देण्यात येईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि.१२/२/२०२१ रोजी माझ्या सहीने दिले.

सही/– क.लिपीक दि.न्याया, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक दि.न्याया, पनवेल

पृष्ठ क्र.१ वरुन...

## ५० कोटी विकास निधी बक्षिस देणार

एनडीआरएफ कडे अत्याधुनिक साहित्य उपलब्ध असते तसे साहित्य उपलब्धता करणे आदी बाबींसाठी निधीचा उपयोग करण्यात येणार असल्याचे आवर्जुन सांगताना मोबाईल डायल्यासिस सिस्टीम सुरू केल्यास ग्रामीण भागातील गरजु रुग्णांना उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात किंवा मोठया शहरात जाण्याची गरज भासणार नाही तालुका ठिकाणी ग्रामीण रुग्णालयात किंवा उपजिल्हा रुग्णालयात उपचार घेता येईल असे आपले प्रयत्न आहेत. मदत व पुनर्वसन अंतर्गत ज्या बाबी प्रस्तावित करण्यात आलेल्या नाहीत त्या बाबींचा विकासाला जिल्हा नियोजन विकास निधींतुन प्राधान्य देण्यात येणार असल्याचे ना. आदिती तटकरे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. राज्याचे शिक्षण व आरोग्य मंत्री ना.उदय सावंत यांचे कडे रायगड जिल्ह्यात फार्मा कॉलेज सुरू करण्याची मागणी केली आहे.

जिल्ह्यात असणाऱ्या औद्योगिक क्षेत्रात स्थानिक तरुण पिढीला रोजणार उपलब्ध व्हावा यासाठी आपले प्रयत्न आसुन लवकरच फार्मा कॉलेजला रोहा येथे मंजुरी मिळावी अशा प्रकारचा प्रस्ताव तयार केला आहे.रायगड जिल्ह्यात विभागीय क्रीडा संकुल उभारणी करण्यासाठी आपण कॅबिनेटची मान्यता मिळण्याचे प्रयत्नात असल्याचे पालकमंत्री आदिती तटकरे यांनी सांगताना हा संकुल काही वर्षापुर्वी पनवेल येथे करण्यासाठी प्रस्तावित होता परंतु तेथे आवश्यक असणारी शासकीय ३० ते ३५ एकर जागा उपलब्ध नसल्याने विभागीय क्रीडा संकुल रायगडात करण्याची मागणी केली आहे. सुधागड येथे आदिवासी सामाजिक विकासासाठी भव्यदिव्य संकुलाची उभारणी करण्यात येणार असून संकुलात २५० विध्यार्थ्यांना शिक्षण व होस्टेलची व्यवस्था,महिला बचत गटांना प्रशिक्षण व स्टॉल,१०० खाटाचें सुसज्ज हॉस्पिटल जेणेकरून एकाच ठिकाणी आदिवासी समाजातील गरीब गरजु घटकाला शिक्षण,आरोग्य आणि रोजगार उपलब्ध होणार आहे.ना. आदिती तटकरे यांनी अधिक माहिती सांगताना लेबर कोर्टातील १७५ प्रकरणे ही उत्तर रायगड जिल्ह्यातील आहेत त्या अनुषंगाने अलिबाग बार असोसिएशनने महाड येथील लेबरकोर्ट अलिबाग येथे स्थलांतरित करण्याची मागणी केले नुसार त्यास हायकोर्टाने मंजुरी दिली आहे आणि हे लेबरकोर्ट आता अलिबागला सुरू होणार असल्याचे सांगितले या मुळे पनवेल,पेण,अलिबाग येथील नागरिकांना सोयीचे होणार असल्याचे सांगितले. जिल्हा नियोजन विकास निधी अंतर्गत महाराष्ट्र शासनाने कोकण विभागात मोठा असलेल्या ठाणे जिल्ह्यासाठी ४०० कोटी रुपये, रायगड जिल्ह्यासाठी २७५ कोटी,रत्नागिरी जिल्हा २५० कोटी,सिंधुदुर्ग १७० कोटी आणि पालघर उपनगर विकासासाठी १८० कोटींचा निधी उपलब्ध करून दिल्याचे वार्तालाप करताना सांगितले.

## जिल्ह्याच्या विकासासाठी २७५ कोटी मंजूर

जिल्हाधिकारी निधी चौधरी, जिल्हा नियोजन अधिकारी जयसिंग मेहेत्रे उपस्थित होते.

रायगड जिल्ह्यासाठी सन २०२०–२१ मध्ये २३४ कोटी रुपये अर्थसंकल्पित करण्यात आले होते. सन २०२१–२२ च्या जिल्हा वार्षिक योजनेमध्ये कृषी व मत्स्य व्यवसाय, शैक्षणिक सोयी सुविधा आणि पर्यटनाला चालना देण्यासाठी पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी अतिरिक्त निधीची मागणी केली होती. ह्या मागणीची दखल घेवून वित्त व नियोजन मंत्री श्री. अजित पवार यांनी २७५ कोटी रुपयांच्या नियतव्ययास मान्यता दिली आहे.

## रायगड जिल्ह्यातील उत्तम काम : ना.गुलाबराव पाटील

सविस्तर माहिती दिली.

रायगड जिल्ह्याला २०२०–२१ मध्ये १लाख १० हजार ९०१ कुटुंबांना नळपाणी उद्दिष्ट देण्यात आले होते. जिल्ह्यात उद्दिष्टापेक्षा जास्त म्हणजे १ लाख १९ हजार १८७ कुटुंबांना नळ कनेक्शन देण्यात आले आहे. तर २० नोव्हेंबरपासून ३४४ शाळा व १ हजार २३४ अंगणवाड्यांना नळ कनेक्शन देण्यात आले आहे. जिल्ह्यातील एकूण गावांपैकी ५५५ गावांमधील १०० टक्के घरांमध्ये नळ कनेक्शन देण्यात आले असल्याबद्दल मंत्री गुलाबराव पाटील यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी जल जीवन मिशन अंतर्गत येणारी रायगड जिल्ह्यातील पाणी पुरवठा योजनांची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करावीत. जिल्ह्यातील प्रलंबित पाणी पुरवठा योजनांचा दरमहा विभागाच्या अधिकाऱ्यांनी आढावा घ्यावा. ३१ मार्च २०२१ पर्यंत सर्व योजना पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागांनी नियोजन करावे, अशा सूचना गुलाबराव पाटील यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना केल्या. तसेच याबाबत पुन्हा बैठक घेण्यात येणार असल्याचे शेवटी त्यांनी सांगितले.

जल जीवन योजनेंतर्गत उत्तम कार्य केल्याबद्दल रायगड जिल्हा परिषदेला सन्मानपत्र देऊन राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग मंत्री गुलाबराव पाटील यांनी सन्मानित केले. जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा योगिता पारधी यांनी सन्मानपत्र स्विकारले. तसेच राज्यात १०० टक्के घरांना नळ कनेक्शन देणारा उरण तालुका प्रथम ठरल्याबद्दल सन्मानपत्र देऊन तालुक्याचा गौरव करण्यात आला. गटविकास अधिकारी निलम गाडे, उप अभियंता संजय वेंगुर्लेकर यांनी हे सन्मानपत्र स्वीकारले.

## शिवजयंती उत्सव साध्या पध्दतीने.....

शिवजयंती साजरी करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

शिवजयंतीच्या दिवशी आरोग्यविषयक शिबीरे ,उपक्रम आयोजित करण्यास शिवजयंती मंडळांनी प्राधन्य द्यावे. यावेळी सोशल डिस्टन्सींग तसेच स्वच्छतेचे नियम जसे की मास्क, सॅनिटायझर वापरावे. असे निर्देश शासनाच्यावतीने देण्यात आले आहे.

शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिका प्रशासनाच्यावतीने मा. महापौर डॉ. कविता चौतमोल यांच्या अध्यक्षतेखाली शिवजयंती उत्सव समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी महापौरांनी देखील शासनाच्या नियमांचे पालन करून शिवजयंती साजरी करण्याचे आवाहन केले. याच पध्दतीने माघी गणेश उत्सव देखील साध्या पध्दतीने साजरा करावा असे आवाहन प्रशासनाच्यावतीने शहरातील गणेश मंडळांना करण्यात आले आहे. या बैठकीस शहर पोलिस निरीक्षक लांडगे, स्थायी समितीचे अध्यक्ष संतोष शेट्टी, महिला बालकल्याण सभापती मोनिका महानवर,प्रभाग समिती 'क'सभापती हेमलता म्हात्रे, उपायुक्त विठ्ठल डाके, सहाय्यक आयुक्त चंद्रशेखर खामकर, शिवजयंती उत्सव समितीचे सदस्य, शहरातील विविध संघटनाचे अध्यक्ष तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

## वाणिज्यिक भूखंडांना प्राप्त झाले विक्रमी दर

नवी मुंबईतील खारघर येथील सेक्टर २७ येथे एकूण ९ भूखंड, कळंबोली सेक्टर १७ येथे ४ भूखंड, सानपाडा सेक्टर ८ मध्ये ३ तर सेक्टर १८ मध्ये २ भूखंड व उलवे येथे सेक्टर १९ मध्ये १ भूखंड असे एकूण १९ भूखंड भाडेपट्ट्यावर विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आले होते. सदर भूखंड हे निवासी/वाणिज्यिक वापराकरिता उपलब्ध होते. ई–लिलाव व ई–निविदा प्रक्रिये अंतर्गत अर्ज नोंदणी, अनामत रकमेचा भरणा, निविदा भरणे या सर्व प्रक्रिया सुलभ, पारदर्शक व जलद अशा ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात आल्या. यामध्ये ऑनलाईन माध्यमातून बंद निविदा सादर केल्यानंतर अर्जदरांना पुढील टप्प्यातील ई–लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होता येणार होते. बंद निविदेमध्ये उद्धृत करण्यात आलेली बोली किंवा ई–लिलावामध्ये उद्धृत करण्यात आलेली बोली यांपैकी जी बोली जास्त रकमेची असेल ती बोली स्वीकारण्याचा निकष निश्चित करण्यात आला होता. सिडकोतर्फे सादर करण्यात येत असलेल्या या योजनांना अभूतपूर्व मिळणारा प्रतिसाद हा सिडकोवर असणाऱ्या सर्वसामान्यांच्या विश्वासाचे प्रतिक आहे, असे मत सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांनी व्यक्त केले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले. दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## शेकाप नवीन पनवेलकडून संयुक्त जयंती साजरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शेकाप नवीन पनवेल पनवेल महानगरपालिका विरोधी पक्ष नेते श्री प्रितम दादा म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली युवा नेते सुनील वानखडे आयोजित माता रमाई आंबेडकर, राजमाता जिजाऊ माता अहिल्याबाई होळकर, माता सावित्रीबाई फुले,यांची संयुक्त जयंती पंचशील नगर नवीन पनवेल येथे आयोजित केली होती या जयंती कार्यक्रम आदरणीय माताचे फोटो पूजन करून महाराष्ट्राचे प्रसिद्ध गायक प्रल्हाद शिंदे यांचे पुत्र चंद्रकांत शिंदे यांचा भरदार गीतांचा कार्यक्रम झाला या कार्यक्रमा शेकडो नागरिक उपस्थित राहून याचा आनंद घेतला.

या कार्यक्रमाला पुरोगामी संघटना जिल्हा अध्यक्ष देवेंद्र पाटील पनवेल महानगरपालिका जिल्हा चिटणीस व नगरसेवक गणेश कडू, विधानसभा क्षेत्र उपाध्यक्ष कादरीभाई कच्छी, पुरोगामी तालुका अध्यक्ष पुरुषोत्तम भोईर, नगरसेविका प्रिती जॉर्ज म्हात्रे, नगरसेविका सारिका भगत, शेकाप जिल्हा सह चिटणीस प्रभाकर कांबळे, सुकापूर ग्रामपंचायत सदस्य प्रज्ञा उभाले आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाला गणेश कडू यांनी बोलताना सांगितले की सुनील वानखेडे हे शेकाप च्या माध्यमातून संयुक्त जयंती चांगली आयोजित केली असून आम्ही नेहमी शेकपक्ष झोपडपट्टी च्या आदी अडचणीला उभे राहू असे आश्वासन देऊन सर्व नागरिकांना रमाई आंबेडकर व सर्व मातांच्या संयुक्त जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी सचिन आठवले, वैभव घोलप, किशोर जाधव, मिहिर कांबळे, तेजस कांबळे, शुभम सातपुते, मनोहर गवई, क्रांतीकारी बिट्स पनवेल,मॅजिक बॉईज ग्रुप कामोठे अजय मुजिकल ग्रुप गोवंडी जितू मुजीकल ग्रुप,पवन पुत्र ब्रास बँड मोठा खांदा पनवेल,साई आदर्श मुजिकाल ग्रुप चेंबूर,पनवेल बिट्स इ.मेहनत घेतली.



# माथेरान पाणीप्रश्न सोडविण्यास पालिकेचा पुढाकार

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान पर्यटन नगरीमध्ये सध्या होत असलेल्या अनियमित पाणी पुरवठ्यावर माथेरानच्या नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांनी जलप्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांबरोबर नगरपालिका दालनात चर्चा करून नागरिकांना भेडसावत असलेल्या पाणी टंचाईबद्दल खडसावताना पाणी पुरवठा सुरळीत व्हावा ह्याकरता तंबी दिली.



मागील अनेक दिवसांपासून माथेरान कर असुरळीत पाणी पुरवठ्यामुळे हैराण आहेत आता सध्या मंदीचा काळ असतानाही पाणी पुरवठा अनियमित होत आहे माथेरान ला पिण्यासाठी येथील शारलेट लेक येथून पाणी पुरवठा होत होता तसेच सुधारित पाणी पुरवठा योजने अंतर्गत नेरळ येथून जलवाहिनी द्वारे माथेरान करिता पाणी पुरवठा होत आहे पण ही व्यवस्था वारंवार बिघडत असल्याने त्याचा सर्व भार माथेरानमधील शारलेट लेक च्या पाणी पातळीवर होत आहे नेरळ लाईन बंद झाल्यानंतर माथेरानच्या शारलेट लेक चा भरमसाठ उपसा झाल्यामुळे तलावाच्या पाण्याची पातळी खालावली आहे हा माथेरान च्या पर्यटनासाठी चिंतेचा विषय आहे ,शारलेट लेकचे पाणी माथेरानच्या मे महिन्यातील पर्यटन हंगामामध्ये माथेरान करिता नेहमीच वरदान ठरलेले आहे त्यामुळेच माथेरानच्या नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांनी जलप्राधिकारणाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्यांच्या दालनात बोलावून विशेष बैठकीचे आयोजन केले होते त्यामध्ये माथेरान करिता मे महिन्याच्या काळामध्ये अखंडित पाणी पुरवठा कसा होईल ह्यावर भर देण्यात आला, माथेरानचे शिवसेना गटनेते प्रसाद सावंत यांनीं ह्यावेळी जल प्राधिकरणाच्या चुका दाखवून त्याकडे त्वरित लक्ष देण्यास सांगितले नेरळ माथेरान दरम्यान २२ ठिकाणी लिकेज असल्याने माथेरानमध्ये पाणी कमी दाबाने उत्सर्जित होत आहे त्या लिकेजेस ताबडतोब काढण्यास ह्यावेळी त्यांनी सांगितले तर ह्याच लाईनवर अनेकांना थेट पाणी जोडण्या देण्यात आल्यात त्याचाही फटका माथेरानच्या पाणी पुरवठ्यावर होत आहे ह्याकडेही अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले व त्यावर लवकरच करावाई करू असे अधिकाऱ्यांनी सांगितले .

माथेरानचे पर्यटन सर्वस्वी पाण्यावर अवलंबून असल्याने हा प्रश्न लवकर निकाली काढावा असे ह्यावेळी नगराध्यक्षा प्रेरणा सावंत ह्यांनी सांगितले जुमापट्टी व वॉटर पाईप येथील पंपिंग स्टेशन मध्ये राखीव पंप उपलब्द करून माथेरांकरांना अखंडित पाणी पुरवठा व्हायलाच हवा असे ह्यावेळी त्यांनी सांगितले तर माथेरान ला पाणी पुरवठा करणारा शारलेट लेक ला गळती लागली असून मोठी दुर्घटना होण्याअगोदर ह्या तलावाची दुरुस्ती व्हावी असे ही त्यांनी सांगितले शारलेट लेक ची घातलेली पातळी भरून काढण्यासाठी दर बुधवारी माथेरानला होणारा पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार असून मे महिन्यातील पर्यटन हंगामामध्ये माथेरान ला मुबलक पाणी पुरवठा केला जाईल व त्याचे नियोजन आतापासूनच सुरु केल्याचे जलप्राधिकारण अभियंता प्रवीण बिर्ला ह्यांनी ह्यावेळी सांगितले. माथेरानचा पाणी पुरवठा नियमित राहावा ह्या करिता सर्वतोपरी सहाय्य करू असे ह्यावेळी मुख्याधिकारी प्रशांत जाधव यांनी सांगितले ह्या बैठकीस माथेरानच्या नगराध्यक्षा प्रेरणा सावंत,उपनगराध्यक्ष आकाश चौधरी,मुख्याधिकारी प्रशांत जाधव, गटनेते प्रसाद सावंत जलप्राधिकरणाचे पनवेल येथील अभियंते विजय सूर्यवंशी माथेरानचे तांत्रिक उपअभियंता भोसले शाखाधिकारी प्रवीण बिर्ला नगरसेवक नरेश काळे, शकील पटेल, राजेंद्र शिंदे माथेरान मनसे शहराध्यक्ष संतोष कदम उपस्थित होते.

# होर्डिंगसाठी वृक्षांची खुलेआम कत्तल ; महापालिकेसह संबंधित यंत्रणा निद्रस्त अवस्थेत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरात जाहिरातीच्या होर्डिंगसाठी वृक्षांची खुलेआम कत्तल केली जात आहे. कळंबोली वसाहतीत पनवेल सायन महामार्गालगत असे प्रकार सर्रास घडत आहेत. आता तर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ च्या बाजूला आसुडगाव हद्दीत सुद्धा होर्डिग्जला अडथळा येऊ नये म्हणून रात्रीतून झाडे तोडण्यात आल्याचा प्रकार घडलेला आहे. महापालिकेसह इतर यंत्रणा निद्रस्त अवस्थेत असल्याने वनराई नष्ट केली जात आहे. यासंदर्भात वारंवार आ-वाज उठवणारे राष्ट्रवादीचे युवानेते प्रशांत रणवरे यांनी पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्याकडे तक्रार करणार आहेत.



पनवेल परिसरातून जाणाऱ्या महामार्गालगत जाहिरात एजन्सीकडून अनेक ठिकाणी होर्डिंग्ज उभारले आहेत. त्यापैकी काही बेकायदेशीर असून काहींना महानगरपालिकेकडून परवानगी देण्यात आली आहेत. पनवेल सायन महामार्गा बरोबरच राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ च्या बाजूला ही अशाप्रकारे होर्डिग्ज लावण्यात आले आहेत. यावरील जाहिराती दूरवरुन दिसाव्यात त्याचबरोबर त्याच्याकडे सहज लक्ष द्यावे या साठी अडथळे असलेले झाडे सर्रासपणे तोडले जात आहेत . कलंबोली सर्कल पासून जवळच असलेल्या आसुडगाव ट्रक टर्मिनल च्या बाजूला महामार्गालगत काही हिरवेगार झाडे होते. त्यांची अगोदरच छाटणी करण्यात आली होती. दरम्यान ही झाडे पुन्हा बहरत असताना दोन दिवसांपूर्वी ते अक्षरशः तोडण्यात आली आहेत. त्यामध्ये एका बदामाच्या झाडाचा ही समावेश आहे. जमिनीपासून वरती या झाडांची कत्तल करण्यात आली आहे. पेट्रोल पंपा लगत असलेल्या एका होर्डिंगला अडथळा येत असल्याने अशाप्रकारे झाडांचा बळी देण्यात आले आहे. परंतु याबाबत ना कोणती चौकशी झाली. ना महापालिका प्रशासन इतर यंत्रणांनी दखल घेतली. त्यामुळे पर्यावरण प्रेमींनी कडून नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. अशाच प्रकारे कळंबोली परिसरातही होर्डिंगकरीता झाडांची तोड करण्यात आल्याची घटना ताजी आहे. कामोठे हद्दीत सुद्धा जाहिरातीच्या फलकांना अडथळा येत असल्याने वटवृक्षाची काही दिवसांपूर्वी छाटणी करण्यात आली. असे प्रकार सर्रास सुरू असताना महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरण समितीला काहीच पडलेले नसल्याचे दिसून येत आहे. यासंदर्भात राष्ट्रवादीचे युवा नेते प्रशांत रणवरे यांनी वारंवार आवाज उठवला आहे. मात्र याबाबत प्रशासनाकडून कोणतेही पाऊल उचलले जात नसल्याने आपण थेट पर्यावरण मंत्र्याकडे तक्रार करणार असल्याचे रणवरे यांनी सांगितले.

# पी.टी.क्लिनिकल लॅबोरेटरीमध्ये घरफोडी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शहरातील पी.टी.क्लिनिकल लॅबोरेटरीमध्ये अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून लॅपटॉप मोबाईल व रोख रक्कम असा मिळून जवळपास २३ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेल्याची घटना घडली आहे.

पी.टी.क्लिनिकल लॅबोरेटरीच्या लॅबच्या खिडकीचे लोखंडी ग्रील, जाळी व काचेची स्लायडींग कशाने तरी तोडून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करून एक लॅपटॉप, एक मोबाईल व रोख रक्कम असा मिळून जवळपास २३ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेला आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# सद्गुरू श्री साई नारायणबाबा यांच्या जन्मोत्सवानिमित्त समाजोपयोगी कार्यक्रम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सद्गुरू श्री साई नारायणबाबा यांच्या ८५ व्या जन्मोत्सवानिमित्त दि. १४ ते २० फेब्रुवारी २०२१ या कालावधीत पनवेलच्या श्री भगवती साई संस्थान व श्री साई नारायणबाबा आश्रम येथे विविध समोजोपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षी जन्मोत्सवानिमित्त कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात येते परंतु कोरोनाच्या पार्श्वभूमीवर या वर्षी सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



१४ फेब्रुवारी रोजी १२ तास अखंड श्री साई महिमा पाठाचे वाचन, १८ फेब्रुवारी रोजी समाजातील गरीब मुलींचे निशुल्क सामुदायिक कन्यादान, १९ फेब्रुवारी रोजी सत्यनारायणाची महापुजा त्याचप्रमाणे गरीब व गरजू १००० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, जेवण, गरजू वस्तू दिल्या जाणार आहेत. २० फेब्रुवारी रोजी सद्गुरू श्री नारायणबाबा यांच्या जन्मदिनानिमित्त बालदिन तसेच १४० गरीब व गरजू विधवा महिलांना धान्य वाटप तसेच होम हवन, महामंगल स्नान, तुलाभार, महाचरण पुजा, पुष्प अभिषेक, महाआयुष होम आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे श्री साई नारायणबाबा आश्रमाचे अध्यक्ष खेमचंद गोपलानी, सेक्रेटरी रामलाल चौधरी, कोऑर्डिनेटर राम थंदानी यांनी सांगितले.


ॲड.जी.व्ही.मुकणे
अर्जदारातर्फे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज नं.११०/२०२१
ने.ता.२२/३/२०२१

श्री.प्रशांत रमेश संसारे
रा.कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका — सामनेवाला

याअर्थी अर्जदार यांचे वडील कै.रमेश तुकाराम संसारे हे दि.०२/०४/२०१६ रोजी मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेल्या असल्याने अर्जदाराने या न्यायालयात त्यांच्या मृत्यूची नोंद होणेकरिता पनवेल येथील प्रथमवर्ग न्यायालयामध्ये अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहू कै.रमेश तुकाराम संसारे वर नमूद तारखेस व ठिकाणी मयत झाले आहेत किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू व्यक्तीचे मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि.१२/२/२०२१ रोजी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल



अर्जदारतर्फे वकील
ॲड.निलम मुंगाजी

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात
क्रि.एम.ए.नं.१९२/२०२१
ने.ता.१७/३/२०२१

श्रीमती.जानकी शंकर घोलप
वय : ५४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.पालीदेवद, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
ग्रामपंचायत अधिकारी / ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

ज्यापेक्षा कै.सारजबाई दिनकर नाईक यांचा मृत्यू दि.०८/१०/२०१२ रोजी मु.पालीदेवद, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी वयोवृद्ध असल्या कारणाने झालेला आहे. म्हणून अर्जदार श्रीमती.जानकी शंकर घोलप यांनी कै.सारजबाई दिनकर नाईक यांच्या मृत्यूच्या तारखेची नोंद होणेकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदरहू कै.सारजबाई दिनकर नाईक यांचा वर नमूद ठिकाणी मृत्यू झाला आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर जाहीर नाम्याच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय अर्जदार यांचेकडे लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू जन्माची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.१२/०२/२०२१ रोजी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल



अर्जदारतर्फे वकील
ॲड.निलम मुंगाजी

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात
क्रि.एम.ए.नं.१४५/२०२१
ने.ता.१५/३/२०२१

श्री.रवींद्र विठ्ठल देवळेकर
वय : ३३ वर्षे, धंदा : नोकरी
रा.मु.चौक, ता.खालापूर, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
ग्रामपंचायत अधिकारी / ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत वावंजे
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

ज्यापेक्षा कै.नामदेव गोपाळ सुतार यांचा मृत्यू दि.१०/०४/१९९२ रोजी मु.वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी वयोवृद्ध असल्या कारणाने झालेला आहे. म्हणून अर्जदार श्री.रवींद्र विठ्ठल देवळेकर यांनी कै.नामदेव गोपाळ सुतार यांच्या मृत्यूच्या तारखेची नोंद होणेकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदरहू कै.नामदेव गोपाळ सुतार यांचा वर नमूद ठिकाणी मृत्यू झाला आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर जाहीर नाम्याच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय अर्जदार यांचेकडे लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू जन्माची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.१२/०२/२०२१ रोजी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल



श्री.भाकरे सो.कोर्ट
ॲड.प्रिया मोरे

## जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१५१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२२/३/२०२१

१) श्रीमती.अलका कैलास पाटील व इतर — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

वरील अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ यांचे वडील कै. श्री.कैलास तुकाराम पाटील यांचे दि.२८/०१/२०२० रोजी गाव : हिवतड, ता.आटपाडी, जि.सांगली येथे आजाराने निधन झाले. मयत कै.श्री.कैलास तुकाराम पाटील यांचे नावे असलेल्या जंगम मालमत्तेचे वर्णन खालीलप्रमाणे

**नाव : श्री.कैलास तुकाराम पाटील**
**बचत खाते नं. : ६६०२४६७४०८६**
**रु.१,५६,५४२/- (रु.एक लाख छपन्न हजार पाचशे बेचाळीस मात्र)**
**लॉकर नं.१७२**
**बँक : स्टेब बँक ऑफ इंडिया, शाखा-लिमडी, गुजरात**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने कायदेशीर उत्तराधिकार प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१२/२/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे वर्णन केलेली जमीन मिळकत ही जमीन मालक/भोगवटादार श्री.दत्तू शंकर चौधरी, श्री.गणू उर्फ गणेश शंकर चौधरी, श्रीमती.वनाबाई उर्फ वनिता रामदास भगत, श्रीमती.हाशीबाई उर्फ द्रौपदी शांताराम चौधरी, श्री.उमेश शांताराम चौधरी, श्रीमती.वैशाली अंकुश पाटील, श्रीमती.जनाबाई धोंडूराम फडके, श्रीमती.हौसाबाई रामचंद्र उर्फ काळुराम शेळके रा.वाजापूर, ता.पनवेल यांच्या नावे दाखल आहे. सदरहू मिळकत आमचे अशिल श्री.संतोष कृष्णाजी घरत, रा.जासई, ता.पनवेल, जि.रायगड हे कायमस्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदरहू जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे : वाजापूर, ता.पनवेल, जि.रायगड येथील जमीन मिळकत**

| अ.नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) (पोटखराब्यासहीत) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | २१ | अ/२/ब | ०-३६-५० | ८=०० |

सबब या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, वर उल्लेख केलेल्या जमीन मिळकती संदर्भात कोणीही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, भाडेपट्टा, खरेदी-विक्रीचा व्यवहार, साठेकरार, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र, लीज, ताबा, हक्क, पोटगी, कुलमुखत्यारपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, दिवाणी दावा, महसूलवाद असल्यास त्यांच्या लेखी हरकती त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे हरकत मुदतीत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल नमूद केलेले मालक/भोगवटादार यांचेबरोबर ठरलेला कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १२/२/२०२१

**सही/-**
**ॲड.एच.ए.भगत**
**वकील मुंबई हायकोर्ट, मोबाईल नं.८०८०२०२२७२**
**पत्ता : सुशिल प्राईड, १०१-१०२, दुसरा मजला,**
**गार्डन हॉटेल बसस्टॉप जवळ, ता.पनवेल, जि.रायगड**



मा.बहिर साहेब, पनवेल यांच्या कोर्टात
वकील : रुपाली काकडे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
क्रि.एम.ए.नं.९८/२०२१
नि.नं.१०/ड
ने.ता.०३/०४/२०२१

श्री.संजीव भगवंत पगारे — अर्जदार
विरुद्ध
१) शायली संजीव पगारे
२) सिद्धीका संजीव पगारे
३) शंतनु संजीव पगारे तर्फे आ.पा.संजीव पगारे — सामनेवाले

वरील अर्जदाराच्या पत्नी व सामनेवाले १, २ व ३ यांचे आई कै.अनिता संजय पगारे यांचे दि.५ एप्रिल २०१३ रोजी मुंबई येथे निधन झाले. कै.अनिता संजय पगारे यांच्या नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**सदनिका नं.ए-२०१, दुसरा मजला,**
**(सदर सदनिकेचा ५०% अविभाज्य भाग)**
**बालाजी सृष्टी को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.**
**प्लॉट नं.२३, सेक्टर २०, कळंबोली, नवी मुंबई,**
**ता.पनवेल, जि.रायगड**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसाचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाच्या दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत ह्या न्यायालयात दाखल करावी.

वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१२/२/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## पनवेलमध्ये रंगणार रायगडमधील डॉक्टरांचे क्रिकेट सामने

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल डॉक्टर्स जनरल प्रॅक्टिशनर असोसिएशन च्या वतीने दिनांक १३जानेवारी२०२१आणि १४जानेवारी २०२१ पनवेलमध्ये रंगणार डॉक्टरांचे क्रिकेट सामने रंगणार आहेत.

कोरोनाचे संकट कमी झाल्यामुळे सध्या डॉक्टरांनी आपला व्यवसाय सुरु केला आहे. थोडासा विरंगुळा म्हणून पनवेल डॉक्टर्स जनरल प्रॅक्टिशनर असोसिएशन च्या वतीने दि १३फेब्रुवारी २०२१ रोजी रायगड जिल्ह्यातील डॉक्टरांची रायगड डॉक्टर्स प्रीमियर लीग .तसेच महिला डॉक्टरांसाठी बॅडमिंटन स्पर्धा .आणि दि १४फेब्रुवारी २०२१ रोजी पनवेल परिसरातील डॉक्टरांची पनवेल डॉक्टर्स प्रीमियर लीग आणि महिला डॉक्टरांची बॉक्स क्रिकेट लीग होणार असल्याची माहिती पनवेल डॉक्टर्स जनरल प्रॅक्टिशनर असोसिएशन चे अध्यक्ष डॉ वैभव मोकल सांगितली.

या दोन्ही स्पर्धा पनवेल मधील सिडको मैदान ,पिल्लई कॉलेज नवीन पनवेल मध्ये होणार आहेत.या मध्ये रायगड जिल्ह्यातील डॉक्टरांचे ०८ संघ शनिवारी खेळतील .त्याच दिवशी महिला डॉक्टरांच्या बॅडमिंटन स्पर्धा होतील. रविवारी पनवेल परिसरातील डॉक्टरांचे ०८ संघ खेळतील, आणि महिला डॉक्टरांचे ०६संघ बॉक्स क्रिकेट खेळतील.

या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी पनवेल डॉक्टर्स जनरल प्रॅक्टिशनर असोसिएशन चे सर्व पदाधिकारी आणि सदस्य मेहनत घेत आहेत.

# भेंडखळचे बीपीसीएल प्रकल्पग्रस्त रोजगार मिळविण्यासाठी रस्त्यावर उतरणार

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील भेंडखळ येथील बीपीसीएलच्या उर्वरीत प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून घेण्याबाबतचे पत्र भारत पेट्रोलियम प्रकल्पग्रस्त संघर्ष समिती,भेंडखळच्या वतीने भेंडखळ येथे असलेल्या बीपीसीएल कंपनी प्रशासनाला देण्यात आले आहे.हे पत्र देण्यापुर्वी भारत पेट्रोलियम व्यवस्थापन व प्रकल्पग्रस्त तसेच भेंडखळचे सरपंच, सदस्य यांच्याबरोबर झालेली चर्चा देखील करण्यात आली आहे.

यापुर्वी अनेक आंदोलने झाली. शरद पवार हे मुख्यमंत्री असतांना त्यांनी बीपीसीएल कंपनी प्रकल्पग्रस्तांच्या रोजगारबाबतची सकारात्मक भूमिका घेतली होती. या सर्वांचा विचार करून इतर बेरोजगार प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून घ्यावे अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा बीपीसीएल कंपनी प्रशासनाला एका निवेदनाद्वारे प्रकल्पग्रस्त संघर्ष समितिचे अध्यक्ष अनिल अशोक ठाकुर यांनी दिला आहे.



भारत पेट्रोलियम प्रकल्पात नव्याने नोकरभारती करता येणार नाही असे व्यवस्थापनाचे म्हणणे आहे मात्र केंद्र सरकारच्या नविन आदेशानुसार फिक्स टर्म रेक्रुइट्मेंट म्हणून प्रकल्पग्रस्तांना घेण्यात कोणतीही हरकत नसावी असे प्रकल्पग्रस्तांचे म्हणणे आहे. यामुळे व्यवस्थापनास नविन कामगार मिळतील व सध्या होत असलेल्या खर्चापेक्षा खर्च देखील कमी होईल.

मात्र व्यवस्थापन कोणत्याही प्रकारची सकारात्मक भूमिका घेत नसल्याने प्रकल्पग्रस्त संघर्ष समिति आता आक्रमक भूमिका घेण्याच्या तयारीत असून नुकतीच त्यांची एक बैठक पार पडली व त्यामधे पुढील आंदोलनाची दिशा ठरविण्यात आल्याचे व न्याय न मिळाल्यास प्रकल्पग्रस्त लवकरच रस्त्यावर उतरतील असे प्रकल्पग्रस्त संघर्ष समितिचे अध्यक्ष अनिल अशोक ठाकुर यांनी सांगितले. यावेळी उपाध्यक्ष लिलेश्वर भगत, सेक्रेटरी अक्षय भोईर, सहसेक्रेटरी रोहिदास घरत, खजिनदार शक्ति पाटिल, कमलाकर मोकल, कैलास भोईर, सचिन पाटील, मेघनाथ भगत, महेंद्र घरत,ध्रुवा ठाकूर व इतर सर्व सदस्य उपस्थित होते.

## शिवजयंती निमित्त 'मराठी वेशभूषा स्पर्धा'

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारतीय जनता पार्टी प्रभाग क्र. १९ च्या वतीने बुधवार दिनांक १९ फेब्रुवारीला छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त 'मराठी वेशभूषा स्पर्धा' आयोजित करण्यात आली आहे.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे होणारी हि स्पर्धा १५ वर्षांखालील मुलामुलींसाठी असून पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील स्पर्धकांसाठी मर्यादित आहे. या स्पर्धेतील प्रत्येक स्पर्धकाला सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी नाव नोंदणीची अंतिम तारीख १८ फेब्रुवारी असून अधिक माहिती व सहभागासाठी ७७५७०००००० किंवा ७५०२१००१०० या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांचा रायगड जिल्हा दौरा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्याच्या उद्योग आणि खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, विधी व न्याय, माहिती व जनसंपर्क, राज्यमंत्री तथा पालकमंत्री ना.कु.आदिती तटकरे यांचा जिल्हा दौरा खालीलप्रमाणे शनिवार दिनांक १३ फेब्रुवारी २०१९ रोजी सकाळी ११.०० वा. सुतारवाडी येथून शासकीय वाहनाने खेड, जि.रत्नागिरीकडे प्रयाण. रविवार दिनांक १४ फेब्रुवारी २०१९ रोजी दुपारी ३.०० वा. वेश्वी ता.मंडणगड येथे आगमन व बोटीने बागमांडला ता.श्रीवर्धनकडे प्रयाण. दुपारी ३.३० वा. बागमांडला येथे आगमन व दिघीकडे प्रयाण. सायं.५.०० वा. दिघी येथे आगमन व साजीद करजीकर यांचे सुपूत्र चि.सालिक यांच्या शुभविवाहानिमित्त सदिच्छा भेट. स्थळ : मु.पो.दिघी, ता.श्रीवर्धन. सायं.५.३० वा. दिघी येथून शासकीय वाहनाने वांजळोशी ता.तळाकडे प्रयाण. सायं.७.०० वा. वांजळोशी येथे आगमन व भिमसेन शिवराम शिंदे यांचे सुपूत्र चि.किशोर यांच्या शुभविवाहानिमित्त स्वागत समारंभास उपस्थिती. स्थळ: मु.वांजळोशी, पो.साई, ता.तळा. सोयीनुसार वांजळोशी येथून शासकीय वाहनाने सुतारवाडीकडे प्रयाण सुतारवाडी येथे आगमन व राखीव.

## वावेपोटगे ग्रामपंचायतीवर सेनेचा भगवा



**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहा तालुक्यातील अलिबाग विधानसभा मतदारसंघातील प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या वावेपोटगे ग्रामपंचायतीची सरपंच, उपसरपंच पदाकरिता निवडणूक घेण्यात आली. सरपंच पदाकरिता शारदा मुकेश गिजे यांचाच एकमेव उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी यांनी वावेपोटगे सरपंचपदी शिवसेना पुरस्कृत शारदा मुकेश गिजे यांची बिनविरोध झाल्याचे घोषित केले. तर उपसरपंचपदी स्वप्निल ठाकूर यांची बिनविरोध निवड झाली आहे.

सदर ग्रामपंचायततीवर गेली २० वर्ष सत्ता होती, आमदार महेंद्र दळवी जि.प सदस्या मानसी ताई दळवी तालुकाप्रमुख समीर शेडगे, माजी तालुकाप्रमुख ॲड. मनोजकुमार शिंदे यांच्या आशिर्वादाने पहिल्याच निवडणुकीत सेनेने, बाजी मारून शेकापची सत्ता संपुष्टात आली आहे. या निवडणूकीचे किंगमेकर, मोतीरात गिजे यांनी, निवडणूकीची रणन-ीती आखत सर्वाधिक सदस्य शिवसेना पुरस्कृत निवडून आणण्यात यश प्राप्त केले आहे. या सभेला निवडणूक निर्णय अधिकारी, ग्रामपंचायत सरपंच शारदा गिजे, उपसरपंच स्वप्निल ठाकूर, अनिता ठाकूर, सतिश मोरे यासदस्यांसह तलाठी सांभरे ग्रामसेविका उपस्थित होते.

सरपंच शारदा गिजे, उपसरपंच स्वप्निल ठाकूर यांचे अभिनंदन आमदार महेंद्र दळवी, तालुकाप्रमुख समीर शेडगे, मानसी दळवी, मोतीराम गिजे, ॲड मनोजकुमार शिंदे यांच्यासह मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. नवनिर्वाचित सरपंच शारदा गिजे यांनी आमदार महेंद्र दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायतमध्ये विकास कामे सर्व सदस्यांना विश्वासात घेऊन तसेच पक्षभेद, मतभेद बाजूला ठेवून सर्वांगीण विकास साधणार असल्याचे सांगितले.

# श्रीवर्धन समुद्रकिनारी वॉच टॉवरची दुरवस्था

## दिवेआगर, वेळास, आदगाव येथील टॉवर जमीनदोस्त

**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यातील समुद्रकिनारी सुरक्षेच्या दृष्टीकोनातून उभारण्यात आलेले वॉच टॉवर दुरवस्थेत आहेत. तर दिवेआगर, वेळास, आदगाव येथील टॉवर जमीनदोस्त झाल्याने येथे येणाऱ्या पर्यटकांची सुरक्षा वाऱ्यावर असल्याचे दिसत आहे.



श्रीवर्धन हे निसर्ग सौंदर्याने समृद्ध आहे. येथील दिवेआगर, वेळास, आदगाव तसेच आरावी येथील गावांना विस्तृत सागर किनारपट्टी लाभलेली आहे. त्यामुळे येथील अनेक स्थळे विशेषतः किनारपट्टी लोकप्रिय आहे. तसेच ते नेहमीच स्वच्छ दिसत असल्याने किनाऱ्यावर येणाऱ्या बाहेरील पर्यटकांना समुद्रस्नान करण्याचा मोह आवरता येत नाही. परंतु यातील अतिउत्साही पर्यटकांना पाण्याच्या वाढत्या पातळीचा अंदाज नसल्याने, वेळीच सूचना देण्याचे काम किनार्यावरील वॉच टॉवरमध्ये तैनात असणाऱ्या जीवरक्षकाकडून केले जाते. मात्र, सद्यस्थितीत सुरक्षेच्या दृष्टीने उभारण्यात आलेल्या टॉवरची दुरवस्था झाली आहे. त्यामुळे किनार्यावरील नैसर्गिक आपत्तीच्या सूचना देणार कोण? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

जिल्हा प्रशासन आपत्ती निवारण व्यवस्था अंतर्गत साधारण २०१७ ते २०१८ या साली किनार्यावरील वॉच टॉवर बांधण्यात आले. तसेच संबंधित विभागाकडून प्रशिक्षण देऊन जीवरक्षकाची नियुक्ती करण्यात आली. वेळास, आदगाव याठिकाणी दोन व दिवेआगर येथे दोन अशा चार वर्दळीच्या ठिकाणी टॉवर उभे करण्यात आले. यामध्ये अपत्तीवेळी वापरण्यात येणारे मेघा फोन, सायरन, सर्च लाईट अशा सुविधा उपयुक्त ठरत होत्या. सदर टॉवरचा उपयोग तटरक्षक व अन्य सागरी दल करीत असत. मात्र, सद्या दुरावस्थेत पडलेल्या या टॉवरकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष आहे. यांची देखभाल कोणाच्या अखत्यारीत आहे. व पुढे सुविधा पुरविणार कोण? असे एक ना, अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. येथील समुद्र किनारे तसे धोकादायक नाहीत. मात्र, पर्यटन स्थळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये. यासाठी प्रशासनाने अशा सुविधा पुरवण्याची गरज असल्याची मागणी पुढे येऊ लागली आहे.

# रस्त्यात उभ्या असलेल्या अवैध पार्किंगमुळे उरणमधील आजपर्यंत ८०० हुन अधिक नागरिकांचा अपघाताने मृत्यू



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण पनवेल तालुक्याला जोडले गेलेल्या NH 4B हा रस्ता जेएनपीटी ते पळस्पे फाटा जवळपास २५ किलोमीटर आहे. उरण पनवेलची जनता या रस्त्याने नेहमी ये-जा करीत असते. प्रवासासाठी या रस्त्याचा उरण व पनवेल मधील नागरिक खूप मोठ्या प्रमाणात करतात हा रस्ता आता चारपदरी झाला आहे. त्याला सर्व्हिस रोड सुद्धा आहे. ते जनतेच्या सुरक्षेसाठी नसून कंटेनर, ट्रेलर च्या पार्किंग साठी आहे. या रस्त्यामध्ये हायवे आणि सर्विस रोड या दोन्ही ठिकाणी कंटेनर, ट्रेलर ट्रक पार्किंग केले जातात. रात्रीच्या वेळेस दोन्ही ठिकाणी भर रस्त्यात पार्किंग केले जातात. प्रवाशी नागरिकांना येण्या जाण्यासाठी मोकळा रस्ता मिळत नाही. या अवैध पार्किंग मुळे सर्वसामान्यांचे प्रवास धोकादायक झाले असून या अवैध पार्किंगला पोलिसांचे वरद-हस्त असून हे सर्व अवैध पार्किंग पोलिसांच्या आशीर्वादानेच सुरु असल्याचा आरोप काँग्रेसचे उरण विधानसभा अध्यक्ष रोहित घरत यांनी केला आहे.

उरण पनवेल रोड तसेच NH 4B हायवेवर चुकीच्या ठिकाणी उभ्या असलेल्या कंटेनर, ट्रक, ट्रेलर मुळे आजपर्यंत अनेक दुचाकी आणि चारचाकी वाहन चालकांचे या वाहनांना धडक लागून मृत्यू झाले आहेत. विशेष म्हणजे २० ते ४० वयोगटातील व्यक्तींचा यात समावेश आहे. या तरुण युवा वर्गावर कुटुंब सांभाळण्याची प्रमुख जबाबदारी असते. घरातील कर्ता व्यक्ति गेल्याने संपूर्ण कुटुंबावर उपासमारीची वेळ येते. घरातील एक प्रमुख व्यक्ति मृत्युमुखी पडल्याने आख्खे कुटुंब रस्त्यावर येते. त्यांना सहानुभूती तर सोडाच साधे नुकसान भरपाई सुद्धा मिळत नाही. उलट अपघात झालेल्या व मृत्युमुखी पडलेल्या व्यक्ति व त्यांच्या नातेवाईंकावर पोलीस प्रशासनातर्फे गुन्हे नोंदविले जातात. व अवैध पार्किंग करणाऱ्या वाहन चालक व मालकांवर कोणतेही कारवाई न करता त्यांना मोकळे सोडले जाते असे प्रकार उरण-पनवेल तालुक्यात नेहमी पाहावयास मिळतात. मृत्युमुखी पडलेल्या कुटुंबाच्या पाठीशी कोणीही ठामपणे उभे राहत नसल्याचे अनेकवेळा निदर्शनास आले आहे. त्यामुळे अशी घटना कोणीही गांभीर्याने घेत नाहीत. कोणाला याचे सोयसुतक नसते. काही दिवसापूर्वी एक भयानक अपघात झाला त्यात चारचाकी गाडीने चाललेला एक २५ वर्षीय युवक रस्त्यावर उभ्या असलेल्या कंटेनरला मागून जोराने धडकला त्याच्या मेंदूला मार लागला. आज तो हॉस्पिटल मध्ये गंभीर अवस्थेत असून अजूनही तो शुद्धीवर आला नाही. पण पोलिसांनी त्या कंटेनर मालकावर उधार होऊन त्याला काही न करता २५ वर्षीय तरुण जो आजही शुद्धीवर आला नाही त्याच्यावर आरोपी म्हणून गुन्हा दाखल केला. असे अनेक निंदनीय व माणुसकीला काळिमा फासणाऱ्या घटना या परिसरात घडत आहेत. अवैध पार्किंग करणारे चालक, मालकांवर कायद्याचे कोणतेही वचक नसल्याने उरण पनवेल परिसरात दिवसेंदिवस अपघातात वाढ होताना व अनेक नागरिक मृत्युमुखी पडताना दिसत आहेत.यामुळे अवैध पार्किंग करणारे वाहन चालक, मालक यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी उरण पनवेल मधील जनतेसह काँग्रेस पक्षाचे तरुण तडफदार युवा नेतृत्व असलेले उरण विधानसभा युवक काँग्रेसचे अध्यक्ष रोहित घरत यांनी महाराष्ट्र राज्याचे प्रदेश युवक काँग्रेस अध्यक्ष सत्यजित तांबे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

# पनवेल महानगरपालिका

## जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेवून उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | झाडांचा प्रकार व संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १ | श्री.सुधीर यशवंत वाणी, मिडलक्लास सोसायटी बि प्लॉट नं.५२ पनवेल. | १ अशोक | पनवेल महानगपालिका हद्दीतील मिडलक्लास सो.बि. प्लॉट नं.५२ पनवेल येथील १ अशोकाचे झाड कंपाऊंड वॉल वर झुकलेले आहे व त्या झाडाची मुळे खालच्या बाजूने वाढल्याने कंपाऊंड वॉल आवडे झाले आहे व ते पडू शकते. तरी तोडण्यास परवानगी मिळणेबाबत. |
| २ | श्री.चंद्रकांत (राजू) सोनी मा.नगरसेवक पनवेल महानगरपालिका सभापती प्रभाग समिती 'ड' ३६३/३६४, शिवशंकर बिल्डींग, कापड बाजार, पनवेल | १ पिंपळ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील मोमीनपाडा खंडाळकर चाळ येथे गल्लीच्या आत दोन्ही भिंतीच्यामध्ये व गटारावर १ पिंपळाचे मोठे झाड मधोमध वाढलेले आहे. त्या कारणाने गटाराचे पाणी तुंबून राहते. आजूबाजूच्या घरात जाते व पुढे जात नाही. तरी तोडण्यास परवानगी मिळणेबाबत. |
| ३ | डॉ.अनिल लालचंद परमार, निकम परमार हॉस्पिटल ए विंग गुल अपार्टमेंट न्यू उरण रोड नियर पंचरत्न हॉटेल पनवेल | २ बदाम | पनवेल महानगरपालिका हद्दीतील निकम परमार हॉस्पिटल ए विंग गुल अपार्टमेंट न्यू उरण रोड नियर पंचरत्न हॉटेल पनवेल येथील बिल्डींगला धोका असल्यामुळे व जनरेटर शेडचे वारंवार नुकसान होत असल्यामुळे तोडण्यास परवानगी मिळणेबाबत. |
| ४ | सेक्रेटरी/सचिव, इंदूविना को. ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी लि.प्लॉट नं.१४०/१, व्ही.के. हायस्कूल मागे, लाईन आळी, पनवेल | १ आंबा | पनवेल महानगरपालिका हद्दीतील इंदूविना को.ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी लि.पनवेल येथील आवारातील १ आंब्याचे झाड जुने, जीर्ण झालेले व मोडकळीस आलेले स्थितीत आहे. तसेच सदर झाडाचा झोक रस्त्याच्याकडे गेला आहे. सदर झाडाचे खोडाला (बुंध्याला) वाळवी लागली आहे. त्यापासून कोणतेही उत्पन्न येत नाही. सदर झाडाचा अर्धा भाग इमारतीच्या कंपाऊंडच्या आतल्या भागात व अर्धा भाग रोडकडे झुकला असल्यामुळे सदर झाड कधीही निखळून पडून जिवीतहानी होवू शकते. तरी तोडण्यास परवानगी मिळणेबाबत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. विहित मुदतीत सादर न झालेल्या हरकती अगर सूचनेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

जा.क्र.पमपा/वृ.पा./७८/२०२१
दिनांक : ११/०२/२०२१

**सही/-**
**सहा आयुक्त**
**तथा**
**वृक्ष प्राधिकरण**
**पनवेल महानगरपालिका**